नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १९/०३/२०२६ (गुरूवार )

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या १४१ वाहन चालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित/रद्द करण्यात आले

नागपुर ग्रामीण जिल्हयात वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणारऱ्या वाहन चालकांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने वारंवार ई—चलन (E-Challan) झालेल्या वाहन चालकांची माहिती संकलित करून त्यांच्या ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित/रद्द करण्यासाठी संबधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (RTO) प्रस्ताव पाठविण्यात आले आहे.

वाहतूक शाखा नागपुर ग्रामीण यांच्या कडुन करण्यात आलेल्या तपासणीत अनेक वाहनचालकांकडून वेगमर्यादा ओलांडणे,सिग्नल तोडणे,वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी/वाहतूक करणे, मदयपान करून वाहन चालविणे तसेच इतर वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा नियमभंग करणाऱ्या **एकुण २,४९४ वाहन चालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित/रद्द करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (RTO) प्रस्ताव पाठविण्यात आले होते त्यापैकी १४१ वाहन चालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित/रद्द करण्यात आले उरर्वित ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित/रद्द करण्याची कारवाई संबधीत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (RTO) सुरू आहे.**

नागरिकांनी स्वत:च्या तसेच इतरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार आहे.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक
## रामटेक पोलीस नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक :— दिनांक १८/०३/२०२६ रोजी फिर्यादी गोकुल गोविंदा बेहूणे, वय ४६ वर्षे, रा.वार्ड क्र ०१, पटगोवारी ता. रामटेक, जि. नागपूर यांनी पोलीस स्टेशन रामटेक येथे तक्रार दिली की, दिनांक १७/०३/२०२६ रोजी रात्री २१:३० वाजेच्या दरम्यान फिर्यादी आणि त्याच्या सोबतचा मिस्त्री मोटरसायकलने परत येत असता गावातील वडाच्या झाडाजवळील चौकात चार पाच मुले उभी होती. फिर्यादीस बघुन आरोपी पवन कुळे हा गाडीसमोर आला त्यामुळे फिर्यादी आरोपी पवन नारायण कुळे यांच्यात भांडण झाले. या वादाच्या कारणावरून २३:३० वाजताचे सुमारास यातील आरोपी क्रमांक १) पवन नारायण कुळे, २) आकाश नारायण कुळे, ३) नारायण कुळे तिन्ही रा. वार्ड क्र ०१, पटगोवारी, ता. रामटेक, जि. नागपूर यांनी फिर्यादीच्या घरी जावुन फिर्यादीच्या पत्नीला लाठयांनी मारहाण केली व फिर्यादीचा मुलगा आडवा आला असता त्याला सुध्दा मारहाण करून जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणात आरोपीविरूध्द १०९ (१), ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १) पवन नारायण कुळे २) आकाश नारायण कुळे ३) नारायण कुळे तिन्ही रा. वार्ड क्र. ०१, पटगोवारी, ता. रामटेक , जि. नागपूर यांना रामटेक पोलीसांनी तात्काळ दिनांक १८/०३/२०२६ रोजी अटक केली आहे. नमुद आरोपींना दिनांक २१/०३/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.

## पोलीस ठाणे कुही हद्दीतील मौजा पारधी बेडा चांपा शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपींवर २ गुन्हे नोंद २ लाख २० हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त कुही पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कुही :— दिनांक १८/०३/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा पारधी बेडा चांपा शिवारात अवैधरित्या

मोहाफुल गावठी दारु काढली जात आहे. मिळालेलया माहीती च्या आधारे पोलीस पथकाने नमदु घटनास्थळी जावुन धाड टाकली आरोपी नामे नाना उर्फ ज्ञानेश्वर लालचंद पवार, वय ३० वर्ष, रा. पारधी बेडा, चांपा, जि.नागपुर हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टीत दारू काढतांना दिसुन आला. पोलीसांना पाहुन आरोपी पळुन गेला. पोलीसांनी घटनास्थळावरून २००० लिटर मोहाफुल सडवा आणि १२० लिटर मोहाफुल गावठी दारू आणि साहित्य जप्त केले. त्यानंतर सलग दुसरी कारवाई करत दोन महीला आरोपीवर कारवाई करत घटनास्थळावरून १४०० लिटर मोहाफुल सडवा आणि ११० लिटर मोहाफुल गावठी दारू आणि साहित्य जप्त केले. पोलीसांनी घटनास्थळावरील रनिंग भट्टया नष्ट केल्या.

**सदर कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १) ३४०० लिटर मोहपूल सडवा २) २३० लिटर मोहफुल , प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, दारू गाळण्याचे साहीत्या असा एकुण २,२०,५००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**







## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०५ गुन्हे नोंद.

दिनांक १८/०३/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन अरोली, भिवापूर, कुही, कोंढाळी यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या तसेच ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सटट्रापटट्री साहित्य, ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण ४,२२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे चन्द्रमनी अरखित सुनानी, वय ४५ वर्षे, रा. निमखेडा, ता. मौदा, जि. नागपुर हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी क्र. १) विनायक येणुदास शहारे, वय २० वर्ष , २) राजकुमार रामाजी शहारे, वय ३५ वर्ष , ३) नंदेश्वर.ऋशीजी आत्राम, वय ४४ वर्ष ,४) सुरेश दयाराम धनविजय, वय ४५ वर्ष, सर्व रा. विरखंडी (धापर्ला), ता. भिवापुर, जि. नागपुर हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने यांचेवर १ गुन्हा नोंद, तसेच आरोपी क्र. १. गौतम जंगलु येवले, वय ७० वर्ष, रा. तास कॉलनी, भिवापुर ता. भिवापुर, जि. नागपुर हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी क्र. १) नामे देशराज पत्रीकर उके, वय ५५ वर्षे, २) चेतन आंनदराव बोरकर, वय २८ वर्षे, ३) सुरज अनिरूध्द उके, वय ३१ वर्षे, सर्व रा. वग, ता. कुही, जि. नागपुर हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे ईश्वर गोमजी मडावी, वय ६५ वर्ष, रा. सातनवरी, ता. जि नागपूर हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वर १ गुन्हा नोंद, **अशा १० आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०५ गुन्हे दाखल केले आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १० गुन्हे नोंद

दिनांक १८/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, तसेच साहित्य असा एकुण २२४२००/— रूपयांचा

मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) नरेन्द्र रामराव देशमुख, रा. मौदा, जि. नागपुर २) महिला आरोपी ३) सिदधार्थ सुरेष मोरोलिया ४) शंकर गणेश राउत, रा. गळपुरा चौक, काटोल जि. नागपुर ५) दिपेनद्रसिंग जोगेनद्रसिंग भादा, वय २८ वर्ष, रा. सरदार मोहल्ला, पंचवटी काटोल जि. नागपुर ६) देवेन्द्र धंतलाल पवार, वय २४ वर्ष, रा. मेंढेपठार, ता. काटोल, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्र. १) महिला आरोपी २) आरोपी नामे सुरज हरीभाउ गजभिये, वय २९ वर्षे, रा. खरसोली, तह. नरखेड यांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे नाना उर्फ ज्ञानेश्वर लालचंद पवार, वय ३० वर्ष, रा. पारधी बेडा चांपा, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, ०२ महिला आरोपी याचेवर ०१ गुन्हा नोंद **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे पंडीत गणपत बमनोटे, वय ७५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, केळवद याचे वर एक गुन्हा नोंद, अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १० गुन्हे दाखल केले आहे.

नमुद कारवाईत एकुण १) २४५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ४४०० लिटर मोहाफुल रसायन सडवा तसेच साहित्य ३) ४९५० मिली देशी दारू असा एकुण २२४२००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने